अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,
तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बारामती
(स्वायत्त)

# मराठी विभाग

## 'प्रशासनिक मराठी' सर्टिफिकेट कोर्स

## अहवाल

दिनांक : ५/०१/२०२३

मा. प्राचार्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामती, यांस सादर.....

महोदय,

शैक्षणिक वर्ष २०२२–२३ या वर्षी आपल्या महाविद्यालयातील मराठी विभागातर्फे **'प्रशासनिक मराठी'** या सर्टिफिकेट कोर्सचे आयोजन करण्यात आले होते. सदर कोर्सचे आयोजन दिनांक १/१२/२०२२ ते १७/१२/२०२२ या कालावधीत करण्यात आले होते. या कोर्ससाठी एकूण २१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. या विद्यार्थ्यांपैकी २ विद्यार्थी एम.ए. भाग १ (राज्यशास्त्र) आणि १९ विद्यार्थी एम.ए. भाग २ (राज्यशास्त्र) या वर्गाचे आहेत. सदर सर्टिफिकेट कोर्स राबविण्यासाठी व्हाट्स ॲपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा गृप तयार करण्यात आला. त्यावर कोर्सच्या संदर्भात वेळोवेळी माहिती देण्यात आली. वर्गात तास आणि प्रक्टीकल घेण्यात आले. तसेच अंतर्गत मुल्यमापनासाठी विद्यार्थ्यांकडून प्रोजक्ट मागविण्यात आले.

या कोर्सचे तास मराठी विभागातील डॉ. मुक्ता आंभेरे व डॉ. राजकुमार तरडे या प्राध्यापकांनी घेतले. या तासांच्या संपूर्ण नियोजनाचे वेळापत्रक सोबत जोडण्यात आले आहे. या कोर्ससाठी प्रवेश घेतलेल्या २१ विद्यार्थ्यांपैकी १९ विद्यार्थ्यांनी हा कोर्स पूर्ण केला आहे. त्या सर्व विद्यार्थ्यांचे मार्कलिस्ट सोबत जोडले आहे. अशा प्रकारे सदर कोर्स यशस्वीरीत्या राबविण्यात आला.

सदर माहिती आपल्या माहितीसाठी सादर.......

डॉ. मुक्ता आंभेरे
कोर्स समन्वयक

डॉ. सीमा नाईक–गोसावी
विभागप्रमुख, मराठी विभाग